**अकोला आणि धुळे जिल्हयाचे अनुक्रमे वाशिम आणि नंदूरबार असे विभाजन झाल्यानंतर त्याअंतर्गत पाणी पुरवठा विभाग व उप विभागांचे विभाजन करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्र. ग्रापापु-१०९८/प्र.क्र.१६६/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,**
**दिनांक : १६ सप्टेंबर, १९९८.**

**वाचा :-**

१. शासन अधिसूचना म.व.वि.क्र.आरईन-४५९७/सीआर-५/एम-१० दिनांक ३० जून, १९९८.
२. शासन अधिसूचना ग्रा.वि.व,ज.सं.विभाग,क्र.झेडपीए-१०९८/सीआर-५०(१)/०५ दिनांक ३० जून, १९९८.
३. शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्रं.ग्रापापु-१०९३/प्र.क्र.८१९/पापु-०७ दिनांक ६ मार्च, १९९७.
४. शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्रं.ग्रामापु-१०९७/प्र.क्र.१२४/पापु-०७ दिनांक २३ एप्रिल, १९९८ व १९ जून, १९९८.
५. शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्रं.ग्रामापु-१०९७/प्र.क्र.८१/पापु-०७ दिनांक २३.४.१९९८ व दि. १९.६.१९९८
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अकोला यांचे पत्र क्र. जिपअ/ग्रापापु/आस्था/१८५७, दिनांक १७.६.१९९८.

**प्रस्तावना :-**

संदर्भिय क्रं.१ मधील अधिसुचनेद्वारे अकोला आणि धुळे या महसूली जिल्हयाचे विभाजन करुन अनुक्रमे वाशिम आणि नंदूरबार अशा २ नवीन महसुली जिल्हयांची निर्मिती करण्यात येऊन ते दिनांक १ जुलै, १९९८ पासून स्वतंत्रपणे अस्तित्वात आले आहेत. संदर्भिय क्रं.२ येथील अधिसूचनान्वये या नवीन जिल्हयाकरिता जिल्हा परिषद स्थापित करण्यात आलेली आहे. त्यापरिणामी जिल्हा परिषद अकोला आणि धुळे अंतर्गत या विभागाच्या अधिपत्याखालील पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी कार्यान्वित असलेल्या विभाग व उप विभागांची विभागणी उक्त दिनांक १ जुलै, १९९८ पासून वाशिम आणि नंदुरबार या २ नवनिर्मित जिल्हयांमध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेली पार्श्वभूमी विचारात घेता या विभागाच्या अधिपत्याखाली अकोला आणि धुळे जिल्हा परिषदेला संदर्भात नमुद केलेल्या शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दि. ६ मार्च, १९९७ अन्वये पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी जे पाणी पुरवठा विभाग व उपविभाग कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. त्यापैकी या शासन निर्णयासोबतच्या **"प्रपत्र - अ"** मधील रकाना ६ मध्ये दर्शविलेले उप विभाग, त्या उप विभागातील अधिकारी व कर्मचारी, कामकाजाचा कार्यभार, फर्निचर, लेखन सामग्री, वाहने इत्यादीसह जसेच्या तसे वाशिम व नंदुरबार या नवनिर्मित जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यास शासन या आदेशान्वये मंजूरी देत आहे.

२. उपरोक्त संदर्भिय क्रं.४ येथील आदेशान्वये "२२१५- पाणी पुरवठा व स्वच्छता -०१ पाणी पुरवठा,००१ प्रशासन व संचालन, पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय व उपविभागीय आस्थापना (२२१५ १८४३) " या लेखाशिर्षाखाली धुळे व अकोला जिल्हा परिषदेस आस्थापना अनुदान मंजुर करण्यात आले आहे. सदर अनुदान नवनिर्मित मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला आणि धुळे यांनी जिल्हयांकडे वर्ग करण्यात आलेल्या उप विभागांच्या आस्थापना खर्चासाठी मंजूर करणे आवश्यक आहे. यास्तव धुळे व अकोला जिल्हा परिषदेस संदर्भिय शासन निर्णयान्वये सन १९९८-९९ करिता मंजूर करण्यात आलेले अनुदान या शासन निर्णयासोबतच्या **"प्रपत्र -ब"** मधील रकाना ६ ते ८ मध्ये दर्शिवल्याप्रमाणे कमी (-) करण्यास शासन मंजुरी देत आहे. **सदर प्रपत्रातील रकाना ९ ते ११ मधील रकमापेक्षा अधिक खर्च सन १९९८-९९ च्या आर्थिक वर्षात होणार नाही यांची कृपया दक्षता घ्यावी.** उपरोक्त प्रमाण कमी करण्यात आलेले अनुदान नवनिर्मित जिल्हा परिषदेस वर्ग करण्यात आलेल्या उप विभागाकरीता सन १९९८-९९ चा खर्च भागविण्यासाठी "२२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता-०१ पाणी पुरवठा ००१ प्रशासन व संचालन, पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय व उपविभागीय आस्थापना (२२१५ १८४३) " या लेखाशिर्षाखाली या शासन निर्णयासोबतच्या **"प्रपत्र-क"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे. सदर अनुदान संबंधित जिल्हयाचे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण याच्या अधिनस्त ठेवण्यात येत असून **कोषागारातून रोख रकमेच्या स्वरुपात देय राहील. सदर प्रपत्रातील रकाना ३ ते ५ मध्ये दर्शविलेल्या रकमेपैकी जास्त खर्च सन १९९८-९९ मध्ये होणार नाही याची कृपया दक्षता घेण्यात यावी.**

३. उपरोक्त संदर्भिय क्रं.५ येथील आदेशान्वये "२२१५-पाणी पुरवठा व स्वच्छता -०१ पाणी पुरवठा, १९१ स्थानिक संस्था, नगरपालिका इत्यादिंना सहाय्य (पाच) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान (स्थानिक क्षेत्र) नियमित आस्थापना (२२१५ १८८१) या लेखाशिर्षाखाली अर्थोपाय अग्रीमाशी समायोज्य अनुदान धुळे व अकोला जिल्हा परिषदेस मंजूर करण्यात आले आहे. सदर

अनुदान नवनिर्मित जिल्हयांकडे वरील परिच्छेदात दर्शविल्याप्रमाणे वर्ग करण्यात आलेल्या उपविभागाच्या प्रमाणात कमी करुन नवनिर्मित जिल्हयांकडे वर्ग करण्यात आलेल्या उप विभागांच्या आस्थापना खर्चासाठी मंजूर करणे आवश्यक आहे. यास्तव धुळे व अकोला जिल्हा परिषदेस संदर्भिय शासन निर्णय अन्वये सन १९९८-९९ करिता मंजूर करण्यात आलेले अनुदान या शासन निर्णयसोबतच्या **"प्रपत्र-ड"** मधील रकाना ९ ते १४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कमी (-) करण्यास शासन मंजूरी देत आहे. **सदर प्रपत्रातील रकाना १५ ते २० मधील रकमांपेक्षा अधिक खर्च सन १९९८-९९ हया आर्थिक वर्षात होणार नाही याची कृपया दक्षता घेण्यात यावी.** उपरोक्त प्रमाणे कमी करण्यात आलेले अनुदान नवनिर्मित जिल्हा परिषदेस वर्ग करण्यात आलेल्या उपविभागावरील सन १९९८-९९ चा खर्च भागविण्यासाठी "२२१५-पाणी पुरवठा व स्वच्छता -०१पाणी पुरवठा १९१ स्थानिक संस्था, नगरपालिका इत्यादिना सहाय्य (पाच) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदना आस्थापना अनुदान (स्थानिक क्षेत्र) नियमित आस्थापना (स्थानिक क्षेत्र) नियमित आस्थापना (२२१५ १८८१) " या लेखाशिर्षाखाली या शासन निर्णयासोबतच्या **"प्रपत्र-इ"** मध्ये दर्शविल्यानुसार संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अधिनस्त मंजूर करण्यात येत आहे. सदरचे अनुदान हे ग्राम विकास व जल संधारण विभागातर्फे जिल्हा परिषदांना मंजूर करण्यात येत असलेल्या **अर्थोपाय अग्रीमाशी समायोज्य असून कोषागारात रोख रकमेच्या स्वरुपात देय नाही. सदर प्रपत्रातील रकाना ३ ते ८ मध्ये दर्शविलेल्या रकमेपेक्षा जास्त खर्च सन १९९८-९९ मध्ये होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.**

४. नवीन निर्माण करण्यात आलेल्या वाशिम आणि नंदूरबार जिल्हयातील उपलब्ध तालुका पंचायती विचारात घेऊन या जिल्हयाकरिता वर नमूद केल्याप्रमाणे पाणीपुरवठा उप विभागाचे मुख्यालय हे कोणत्या तालुका पंचायतीमध्ये असावे याविषयीचा निर्णय हा ज्या त्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व संबंधिताच्या व विभागीय आयुक्त्याच्या मान्यतेने घ्यावयाचा आहे.

५. उपरोक्त उप विभाग वर्ग करण्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(रु. न. देशमुख)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. मा. राज्यपालाचे सचिव.
२. मा. उपमुख्यमंत्र्याचे सचिव.
३. मा. मंत्री / राज्यमत्री यांचे खाजगी सचिव.
४. महालेखापाल महाराष्ट्र-०१,लेखा परिक्षा, मुंबई (५ प्रतीसह)
५. महालेखापाल महाराष्ट्र-०१,(लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई (५ प्रतीसह)

६. महालेखापाल महाराष्ट्र-०२,लेखा परिक्षा, नागपूर (५ प्रतीसह)
७. महालेखापाल महाराष्ट्र-०२,(लेखा व अनुज्ञेयता ), नागपूर (५ प्रतीसह)
८. विभागीय आयुक्त, नाशिक व अमरावती.
९. जिल्हाधिकारी, धुळे, नंदूरबार, अकोला व वाशिम.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे, नंदूरबार, अकोला व वाशिम.
११. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , मुंबई.
१२. मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक व अमरावती.
१३. अधिक्षक अभियंता तथा जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, धुळे, नंदूरबार, अकोला व वाशिम.
१४. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, धुळे, नंदूरबार, अकोला व वाशिम.
१५. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१६. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण व विकाय यंत्रणा, धुळे, नंदूरबार, अकोला व वाशिम.
१७. विभागीय उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, नाशिक व अमरावती.
१८. संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, मुंबई.
१९. सह संचालक, लेखा व कोषागारे , संगणक कक्ष, मुंबई.
२०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे, नंदूरबार, अकोला व वाशिम.
२१. जिल्हा कोषागार अधिकारी , धुळे, नंदूरबार, अकोला व वाशिम.
२२. मुख्य लेखा परिक्षक , स्थानिक निधी लेखा नवी मुंबई.
२३. उपमुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा, धुळे, नंदूरबार, अकोला व वाशिम.
२४. वित्त विभाग (व्यय-३,अर्थसंकल्प-१६)
२५. नियोजन विभाग
२६. पाटंबंधारे विभाग.
२७. ग्राम विकास व जल संधारण विभाग कार्यक्रम क्रं. ०५,०६,२३,२५,२६,२७,२८
२८. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व अधिकारी व कार्यासने.
२९. निवड नस्ती , (पापु-०७).

**"प्रपत्र अ "**

**शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०९८/प्र.क्र.१६६/पापु-०७**
**दिनांक १६ सप्टेंबर, १९९८ चे सहपत्र.**

| अ.क्रं | जिल्हा | शा.नि.पा.पु.व स्व.वि. दि. ६ मार्च १९९७ अन्वये मंजूर करण्यात आलेले विभाग / उपविभाग | | या आदेशान्वये कमी (-) केलेले विभाग/ उपविभाग | | कमी केलेले विभाग/ उपविभागापैकी नवनिर्मित जिल्हयांकडे वर्ग करण्यात आलेले विभाग / उपविभाग | | पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी उपलब्ध विभाग / उपविभाग | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विभाग | उपविभाग | विभाग | उपविभाग | विभाग | उपविभाग | विभाग | उपविभाग |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | धुळे | - | २ | - | १ (नवापुर) | - | - | - | १ |
| २ | नंदूरबार | - | - | - | - | - | १ (नवापूर) | - | १ |
| ३ | अकोला | १ | ४ | - | २ (मंगरुळपीर, वाशिम) | - | - | १ | २ |
| ४ | वाशिम | - | - | - | - | - | २ (मंगरुळपीर, वाशिम) | - | २ |

(रु. न. देशमुख)
उप सचिव महाराष्ट्र शासन.

**"प्रपत्र ब "**

**शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०९८/प्र.क्र.१६६/पापु-०७**
**दिनांक १६ सप्टेंबर, १९९८ चे सहपत्र.**

लेखाशिर्ष : २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता-०१ पाणी पुरवठा, ००१ प्रशासन व संचालन, पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय व उपविभागीय आस्थापना (२२१५ १८४३)

**(रुपये हजारात)**

| अ.क्रं | जिल्हा परिषद | शा.नि.क्रं. ग्रापापु १०९७/ प्र.क्रं.१२४/ पापु-०७ दि. २३.४.९८ व दि. १९.६.९८ अन्वये मंजुर केलेले अनुदान (अर्थसंकल्पीय तरतूद १९९८-९९) | | | सन १९९८-९९ च्या अर्थसंकल्पीय अनुदानातून या आदेशान्वये कमी (-) करण्यात आलेले अनुदान | | | सन १९९८-९९ या आर्थिक वर्षाकरिता शिल्लक अनुदान | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतन | प्रवास खर्च | एकूण | वेतन | प्रवास खर्च | एकूण | वेतन | प्रवास खर्च | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | धुळे | २१६ | १५ | २३१ | १०८ | ०८ | ११६ | १०८ | ०७ | ११५ |
| २ | अकोला | ६४७ | ४४ | ६९१ | २०० | १४ | २१४ | ४४७ | ३० | ४७७ |

(रु. न. देशमुख)
उप सचिव महाराष्ट्र शासन.

**"प्रपत्र क "**

**शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०९८/प्र.क्र.१६६/पापु-०७ दिनांक १६ सप्टेंबर, १९९८ चे सहपत्र.**

लेखाशिर्ष : २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता-०१ पाणी पुरवठा, ००१ प्रशासन व संचालन, पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय व उपविभागीय आस्थापना (२२१५ १८४३)

**(रुपये हजारात)**

| अ.क्रं | जिल्हा परिषद | सन १९९८-९९ या आर्थिक वर्षाकरिता या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येत असलेले अनुदान | | |
|---|---|---|---|---|
| | | वेतन | प्रवास खर्च | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | नंदूरबार | १०८ | ०८ | ११६ |
| २ | वाशिम | २०० | १४ | २१४ |

(रु. न. देशमुख)
उप सचिव महाराष्ट्र शासन.

**"प्रपत्र ड "**

**शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०९८/प्रक्र.१६६/पापु-०७ दिनांक १६ सप्टेंबर, १९९८ चे सहपत्र.**

**लेखाशिर्ष :** २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता-०१ पाणी पुरवठा, १९१ स्थानिक संस्था, नगरपालिका इत्यादिना सहाय्य (पाच) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान (स्थानिक क्षेत्र) नियमित आस्थापना (२२१५ १८८१)

**(रोख रकमेच्या स्वरुपात देय नाही अर्थोपाय अग्रीमांशी समायोज्य)** **(रुपये हजारात)**

| अ. क्रं | जिल्हा परिषद | शा.नि.क्रं. ग्रापापु १०९७/ प्र.क्रं.८१/ पापु-०७ दि. २३.४.९८ व दि. १९.६.९८ अन्वये मंजुर केलेले अनुदान (अर्थसंकल्पीय तरतूद १९९८-९९) | | | | | | सन १९९८-९९ च्या अर्थसंकल्पीय अनुदानातून या आदेशान्वये कमी (-) करण्यात आलेले अनुदान | | | | | | सन १९९८-९९ या करिता शिल्लक अनुदान | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतन | प्रवास खर्च | कार्यालयीन खर्च | पट्रोल तेल वंगण | भाडे पट्टी व कर | एकूण | वेतन | प्रवास खर्च | कार्यालयीन खर्च | पट्रोल तेल वंगण | भाडे पट्टी व कर | एकूण | वेतन | प्रवास खर्च | कार्यालयीन खर्च | पट्रोल तेल वंगण | भाडे पट्टी व कर | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| १ | धुळे | १५२६ | ७८ | ५० | ३० | - | १६८४ | ७६३ | ३९ | २५ | १५ | - | ८४२ | ७६३ | ३९ | २५ | १५ | - | ८४२ |
| २ | अकोला | ५००६ | २५५ | १२५ | ७३ | ६० | ५५१९ | १३८७ | ५५ | २५ | - | ३० | १४९२ | ३६१९ | २०० | ११५ | ७३ | ३० | ४०२७ |

(रु. न. देशमुख)
उप सचिव महाराष्ट्र शासन.

**"प्रपत्र इ "**

**शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०९८/प्र.क्र.१६६/पापु-०७**
**दिनांक १६ सप्टेंबर, १९९८ चे सहपत्र.**

लेखाशिर्ष : २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता-०१ पाणी पुरवठा, १९१ स्थानिक संस्था, नगरपालिका इत्यादिना सहाय्य (पाच) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान (स्थानिक क्षेत्र) नियमित आस्थापना (२२१५ १८८१)

**(रोख रकमेच्या स्वरुपात देय नाही अर्थोपाय अग्रीमांशी समायोज्य)**

**(रुपये हजारात)**

| अ.क्रं | जिल्हा परिषद | सन १९९८-९९ या आर्थिक वर्षाकरिता या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात येत असलेले अनुदान | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतन | प्रवास खर्च | कार्यालयीन खर्च | पट्रोल तेल वंगण | भाडे पट्टी व कर | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | नंदूरबार | ७६३ | ३९ | २५ | १५ | - | ८४२ |
| २ | वाशिम | १३८७ | ५५ | २० | - | ३० | १४९२ |

(रु. न. देशमुख)
उप सचिव महाराष्ट्र शासन.